**प्रेसनोट** **दिनांकः- ०८/०६/२०१९.**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.**

**विश्रामबाग पोलीस ठाण्याचे पोलीसांकडुन दिव्यांग इसमास माणुसकीचे दृष्टीकोनातुन मदत.**

आज दिनांक ०८/०६/२०१९ रोजी वसंत सिनेमा, ६०३ बुधवार पेठ पुणे येथील विघ्नहर्ता अपार्टमेंट या सोसायटीचे जागेत सदर इमारतीमध्ये राहणारा दिव्यांग इसम आशिष कंठाळे हा विनापरवाना ज्युसची गाडी लावत असलेबाबतची तक्रार घेवून सोसायटीचे सभासद साईनाथ रणपिसे, भैरवसिंग राजपुरोहीत, किशोर घोडे वगैरे लोक विश्रामबाग पोलीस ठाणेत हजर झाले . सदर वेळी विश्रामबाग पोलीस ठाणेचे कम्युनिटी पोलीसिंग ऑफीसर श्री सच्चिदानंद कुळकर्णी, सहायक पोलीस उप निरीक्षक यांनी वरनमुद सोसायटीचे सभासद व दिव्यांग इसम नामे आशिष कंठाळे यांची बैठक घेवून दोन्ही बाजुकडील लोकांचे म्हणणे ऐकुन घेवून त्यांना व्यवस्थित रित्या समजावून सांगुन त्यांचे तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या चर्चेतुन सुवर्णमध्य काढुन दोन्ही बाजुकडील लोकांचे समाधान केले. व त्यांचे तक्रारीचे निवारण केले. सदर वेळी वरनमुद सोसायटीचे सभासद आणि ज्युसची गाडी लावणारा दिव्यांग इसम आशिष कंठाळे यांनी त्यांचे तक्रारीबाबत पोलीसांनी काढलेल्या सुवर्णमध्याबाबत पोलीसांचे आभार मानले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.